नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २६५ Issue - 265 | वार मंगळवार दि. ११ फेब्रुवारी २०२५ Blow- Tuesday Date 11 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# कॉपी रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांची अदलाबदल, ड्रोनची देखरेख

## राज्य मंडळाचे महत्वपूर्ण निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्य मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या बारावीच्या परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी गेल्या पाच वर्षांत गैरमार्ग प्रकरण आढळलेल्या ८१८ परीक्षा केंद्रांवर केंद्र संचालक, पर्यवेक्षक अशा परीक्षा संबंधित कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात आली आहे. त्यात सर्वाधिक केंद्रे छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळातील असून, तसेच संवेदनशील परीक्षांच्या केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख करण्यात येणार आहे. तसेच यंदाच्या परीक्षेत गैरप्रकार घडणाऱ्या केंद्रांची परीक्षा केंद्र मान्यता पुढील वर्षीपासून कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार असल्याचाही इशारा देण्यात आला.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी ही माहिती दिली. राज्यात बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येत आहे. त्या अनुषगाने मुख्य सचिवांनीही बैठक घेऊन उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यात जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्र संचालक, पर्यवेक्षक आणि परीक्षा संबंधित घटकांची फेस रेकग्निशन प्रणालीद्वारे तपासणी, विभागीय मंडळातर्फे अधिकृत आ-ळखपत्र देणे, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे आणि प्रत्यक्ष गैरप्रकार करणाऱ्यावर दखलपात्र, अजामीनपात्र गुन्हा दाखल करणे, परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरात फोटोकॉपी केंद्र बंद ठेवणे, कलम १४४ लागू करणे, परीक्षा केंद्राबाहेर जिल्हा प्रशासनातर्फे चित्रीकरण करणे, परीक्षा केंद्रांवर भरारी पथके आणि बैठी पथके उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यात गेल्या पाच वर्षांत गैरमार्ग प्रकरण आढळलेल्या ८१८ परीक्षा केंद्रांवरील परीक्षा संचालक, पर्यवेक्षक आणि परीक्षा केंद्र संबंधित कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित परीक्षा केंद्रांअंतर्गत समाविष्ट कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना परी-क्षेशी संबंधित कामकाज करता येणार नाही.

या परीक्षा केंद्रांमध्ये पर्यवेक्षकांनी कॉपी पकडलेली केंद्रेही समाविष्ट असल्याने काही केंद्रे कमी होऊ शकतात. ८१८ परीक्षा केंद्रांमध्ये पुणे विभागीय मंडळातील १२५, नागपूर विभागीय मंडळातील १०४, छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळातील २०५, मुंबई विभागीय मंडळातील ५७, कोल्हापूर विभागीय मंडळातील ३९, अमरावती विभागीय मंडळातील १२४, नाशिक विभागीय मंडळातील ८८, लातूर विभागीय मंडळातील ७३ आणि कोकण विभागीय मंडळातील तीन परीक्षा केंद्रांचा समावेश असल्याचे गोसावी यांनी सांगितले.

### २७१ भरारी पथके, आकस्मिक भेटी

**राज्य मंडळाकडून २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती कार्यरत आहे. जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यात परीक्षा पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी आवश्यकतेनुसार नियोजन करण्याची मुभा आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मंडळ सदस्य, शासकीय अधिकारी यांना परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे स्पष्ट करण्यात आले.**

### दोन विद्यार्थ्यांना विशेष सुविधा

शारीरिक अडचण असलेल्या दोन विद्यार्थ्यांना राज्य मंडळाने परीक्षेसाठी विशेष सुविधा दिली आहे. त्यात दृष्टिदोष असलेल्या एका विद्यार्थ्यांना हेडटॉर्च देण्यात येणार असून, संवेदनशील त्वचा असलेल्या एका विद्यार्थ्याला वातानुकूलन व्यवस्था असलेल्या ठिकाणी परीक्षा देण्याची मुभा देण्यात आल्याचे गोसावी यांनी सांगितले.



# प्रयागराजमध्ये वाहतूक कोंडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : पाच तास प्रवास करून अवघं पाच किलोमीटर अंतर पार करता आल्याची एक पोस्ट सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहे. ही पोस्ट महाकुंभ मेळ्यासाठी प्रयागराजच्या दिशेनं निघालेल्या एका भाविकानं शेअर केली असून सध्या भाविक कदाचित जगातल्या सर्वात मोठ्या ट्रॅफिक जाममध्ये अडकले आहेत, असंही या युजरनं आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. या पोस्टमध्ये संबंधित नेटकऱ्यानं या ट्रॅफिक जामचे फोटोही शेअर केले आहेत. त्यामुळे महाकुंभमेळ्याचे साक्षीदार होण्यासाठी आणि गंगेत पवित्र स्नान करण्याच्या आशेनं निघालेल्या भाविकांवर तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडण्याची वेळ ओढवली आहे.

गेल्या तीन आठवड्यांपासून प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याच्या निमित्ताने रोज लाख-ो भाविक दर्शनासाठी जात आहेत. गंगेत पवित्र स्नान करण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी सध्या प्रयागराजमध्ये लोटल्याचं दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रयागराजमधील सोयी-सुविधांवर मोठा ताण निर्माण होत असल्याचं पाहायला मिळालं. काही दिवसांपूर्वी प्रयागराजमध्ये चेंगराचेंगरी होऊन तिथे जीवितहानीही झाली होती. त्यामुळे महाकुंभच्या पार्श्वभूमीवर प्रयागराजमधील सोयी-सुविधांची मोठी चर्चा होत असताना आता प्रयागराजच्या दिशे-ने जाणाऱ्या रस्त्यांवर कैक किलोमीटर लांबपर्यंत अभूतपूर्व वाहतूक कोंडी झाल्याचं दिसून येत आहे.

दरम्यान, भास्कर शर्मा नावाच्या व्यक्तीने आपल्या एक्स अकाऊंटवरून सोमवारी पहाटे ४ वाजता केलेली पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. या पोस्टमध्ये संबंधित व्यक्तीने प्रयागराजकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील वाहतुकीबाबत ८ फेब्रुवारीपासूनच्या पोस्ट शेअर केल्या आहेत. त्यातली शेवटची पोस्ट सोमवारी १० फेब्रुवारी रोजी पहाटे ४ च्या सुमारास केली असून त्यात 'जगातील सर्वात मोठ्या वाहतूक कोंडीत' अडकल्याचा उल्लेख केला आहे.

दरम्यान, मध्य प्रदेशमधून प्रयागराजच्या दिशेनं जाणारे अनेक रस्ते हे अशाच प्रचंड वाह-तूक कोंडीमुळे जवळजवळ बंदच झाल्याची स्थिती निर्माण झाली आहे. रविवारी मध्य प्रदेशातील काही भागात अनेक वाहनांना परत फिरून कटनी आणि जबलपूरला जाण्याचे निर्देश देण्यात आले. तर वाह-तूक कोंडीत अडकलेल्या वाहनांमधील प्रवाशांना पोलिसांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याची विनंती केली आहे.

## थोडक्यात...

### रणवीर अलाहाबादियासह पाच जणांवर गुन्हा दाखल

नवी दिल्ली : युट्यूबर रणवीर अलाहाबादिया याच्या अडचणींमध्ये आणखी भर पडल्याचं दिसून येतं आहे. कारण आता आसाम या राज्यात रणवीर, आशिष चंचलानी, जसप्रीत सिंह, अपूर्वा मखीजा, समय रैना यांच्यासह आणखी एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी पोस्ट करुन ही माहिती दिली आहे. आसाम पोलिसांनी स्टँड अप कॉमेडियन समय रैनाचा शो इंडियाज गॉट लेटेंट च्या नुकत्याच पार पडलेल्या भागामध्ये अश्लीलता पसरवण्यात आली. या चर्चेत रणवीर अलाहाबादिया, समय रैना आणि इतर इन्फ्लुएनसर्स सहभागी झाले होते. त्यामुळे त्यांच्याविरोधात अश्लीलता पसरवल्यासंबंधीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी या संदर्भातली माहिती पोस्ट करुन दिली आहे. आशिष चंचलानी, जसप्रीत सिंह, अपूर्वा मखीजा आणि इतरांनी अश्लीलता वाढवली आहे. यामुळे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे असं म्हटलं आहे.

# राज्यातील पात्रताधारकांना दिलासा; कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय रद्द



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आल्याने त्या माध्यमातून आवश्यक आणि पात्र शिक्षक उप-लब्ध होणार आहेत. त्यामुळे राज्यातील दहा आणि दहापेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये डी.एड., बी.एड. पात्रताधारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती देण्याचा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा (पान २ वर..)

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. सरहद, पुणे आयोजित अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा गौरव केला जाणार आहे, अशी माहिती आयोजकाकडून देण्यात आली. ११ फेब्रुवारी रोजी दिल्लीत नवीन महाराष्ट्र सदनात हा पुरस्कार प्रदान समारंभ होईल. ५ लक्ष रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह आणि शिंदेशाही पगडी असे पुरस्काराचे स्वरुप आहे. केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, जेष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आणि पद्मभूषण राम सुतार यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या पूर्वी शमिमा अख्तर यांच्या अभंग गायनाचा तसेच मराठी गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

# औषधांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह, दोन वर्षात तपासलेल्या २२ हजारापैकी आठ औषधे कमी दर्जाची

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यामध्ये सापडलेल्या बनावट औषधांच्या पार्श्वभूमीवर सर्व आरोग्य संस्थांमधील उपलब्ध साठा व त्याची गुणवत्ता तपासणीसाठी राज्य सरकारने नियमावली जाहीर केली आहे. मात्र मागील दोन वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणने खरेदी केलेल्या २२ हजार ३६७ औषधांपैकी अवघे आठ नमुने कमी दर्जाचे असल्याचे उघडकीस आले आहे, तर अद्यापही १ हजार ६१६ औषधांच्या नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. यामुळे स्थानिक पातळीवर खरेदी करण्यात येत असलेल्या औषधांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यातील सर्व रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांसाठी औषध खरेदीची जबाबदारी १५ ऑगस्ट २०२३ पासून महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणावर आहे. राज्यामध्ये काही महिन्यांपूर्वी विविध रुग्णालयांमध्ये बनावट औषधांचा साठा सापडला होता. या धर्ती-वर प्राधिकरणने राज्यातील सर्व जिल्ह्यांतील रुग्णालयांसाठी दोन वर्षांत खरेदी केलेल्या विविध प्रकारच्या औषधांच्या नमुन्यांची तपासणी केली. या तपासणीत २०२३-२४ मधील नमुन्यांपैकी तीन, तर २०२४-२५ मधील नमुन्यांपैकी पाच नमुने कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले आहे.

प्राधिकरणाने २०२३-२४ मध्ये १२ हजार ७६७ प्रकारच्या औषधांची खरेदी केली होती. त्यापैकी १ हजार ८८४ औषधांचे नमुने एनएबीएल प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविले होते. तपासणीसाठी पाठविलेल्या नमुन्यांपैकी १ हजार ७७२ प्रकारचे नमुने वापरण्यास योग्य असून तीन नमुन्यांचा दर्जा अयोग्य असल्याचे अहवालात म्हटले होते. यापैकी अद्याप १०९ नमुन्याचा अहवाल प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे २०२४-२५ मध्ये प्राधिकरणने खरेदी केलेल्या ९ हजार ६०० प्रकारच्या औषधांपैकी ४ हजार ६९१ नमुने तपासण्यासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्यापैकी ३ हजार १७९ औषधे वापरण्यास योग्य असून पाच औषधांचा दर्जा अयोग्य असल्याचे आढळून आले. तसेच १ हजार ५०७ नमुन्यांचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. एनएबीएल प्रयोगशाळेकडून आलेल्या अहवाल-ानुसार अयोग्य दर्जा असलेल्या (पान ४ वर...)

१० वी, १२ वी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांशी संवाद

विविध शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती

# योग्य नियोजनासह सकारात्मकतेने परीक्षांना सामोरे जा : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जीवनात स्वतःशी स्पर्धा ठेवून प्रत्येक क्षण सकारात्मकतेने जगा. आत्मविश्वास वाढण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करा, उद्दिष्टांचे लहान लहान टप्पे करुन ते पूर्ण केल्याचा क्षण साजरा करा. तसेच परीक्षांचा ताण न घेता अभ्यासावर लक्ष केंद्रित करा, त्यातून नक्की यश मिळेल, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी नवी दिल्ली येथे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या मुंबईत शिवाजी पार्क येथील स्काऊट आणि गाईडच्या सभागृहात झालेल्या प्रस-ारण कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्यासह विविध शाळांमधील विद्यार्थी उप-स्थित होते.

पंतप्रधान मोदी यांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा हेच अंतिम ध्येय न ठेवता सर्वांगीण ज्ञान मिळविण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा. स्वतःला ओळखून वर्तमानातील प्रत्येक क्षण उत्तम पद्धतीने जगावा. लिहिण्याच्या सवयीतून आपले मत व्यक्त होत असते.

अपयश हे जीवनात यशस्वी होण्यासाठीचे इंधन असते, असे सांगून पंतप्रधान मोदी यांनी विद्यार्थ्यांना अपयशाची भीती न बाळगता त्याला आपला गुरू बनविण्याचा सल्ला दिला. एकाग्रतेसाठी ध्यान धारणेला महत्त्व असल्याचे सांगून निसर्ग, संतूलित आहार, नवनवीन तंत्रज्ञान, नेतृत्व करताना टीम वर्क आदी बाबींचे महत्त्व त्यांनी समजा-वून सांगितले. विद्यार्थ्यांनी निसर्गाची काळजी घेण्याचे आवाहन करून



त्यांनी विद्यार्थ्यांना 'एक पेड मा के नाम' अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. पालकांनी विद्यार्थ्यांमधील क्षमता, त्यांच्या इच्छा ओळ-खावी आणि त्यांना प्रोत्साहन देऊन मदत करावी, असे आवाहन त्यांनी पालकांना केले.

### यशासाठी मनातील भीतीवर विजय मिळवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आव्हाने ही सर्वांसमोर असतात. सकारात्मकतेने त्यावर मात करावी, विद्यार्थ्यांनी इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करावी आणि मनातील भीतीवर विजय मिळवावा. सरावाने सामान्य माणूस देखील असामान्य काम करून असामान्य बनू शकतो, यामुळे प्रधानमंत्री यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार स्वतःला ओळखून स्वतःमधील क्षमता वाढविण्याचा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, केवळ परीक्षा हेच अंतिम उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांनी जीवनातील आव्हानांशी कसा सामना करावा यादृष्टीने प्रधानमंत्र्यांशी झालेला संवाद हा अतिशय उपयुक्त आहे. प्रधानमंत्री अतिशय संघर्षमय जीवनातून यशस्वी झाले असून त्यांनी जगात भारताची नवी ओळख तयार केली आहे. या अनुभवातून विद्यार्थ्यांना जीवनाचे ज्ञान मिळावे, हा या कार्यक्रमाचा हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एसएनडीटी महाविद्यालयाच्या डॉ. अदिती सावंत यांच्या कॉटन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

## संपादकीय....

### दर्जावर प्रश्नचिन्ह

राज्यामध्ये सापडलेल्या बनावट औषधांच्या पार्श्वभूमीवर सर्व आरोग्य संस्थांमधील उपलब्ध साठा व त्याची गुणवत्ता तपासणीसाठी राज्य सरकारने नियमावली जाहीर केली आहे. मात्र मागील दोन वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणने खरेदी केलेल्या २२ हजार ३६७ औषधांपैकी अवघे आठ नमुने कमी दर्जाचे असल्याचे उघडकीस आले आहे, तर अद्यापही १ हजार ६१६ औषधांच्या नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. यामुळे स्थानिक पातळीवर खरेदी करण्यात येत असलेल्या औषधांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्यातील सर्व रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांसाठी औषध खरेदीची जबाबदारी १५ ऑगस्ट २०२३ पासून महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणावर आहे. राज्यामध्ये काही महिन्यांपूर्वी विविध रुग्णालयांमध्ये बनावट औषधांचा साठा सापडला होता. या धर्तीवर प्राधिकरणने राज्यातील सर्व जिल्ह्यांतील रुग्णालयांसाठी दोन वर्षांत खरेदी केलेल्या विविध प्रकारच्या औषधांच्या नमुन्यांची तपासणी केली. या तपासणीत २०२३-२४ मधील नमुन्यांपैकी तीन, तर २०२४-२५ मधील नमुन्यांपैकी पाच नमुने कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले आहे. प्राधिकरणाने २०२३-२४ मध्ये १२ हजार ७६७ प्रकारच्या औषधांची खरेदी केली होती. त्यापैकी १ हजार ८८४ औषधांचे नमुने एनएबीएल प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविले होते. तपासणीसाठी पाठविलेल्या नमुन्यांपैकी १ हजार ७७२ प्रकारचे नमुने वापरण्यास योग्य असून तीन नमुन्यांचा दर्जा अयोग्य असल्याचे अहवालात म्हटले होते. यापैकी अद्याप १०९ नमुन्याचा अहवाल प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे २०२४-२५ मध्ये प्राधिकरणने खरेदी केलेल्या ९ हजार ६०० प्रकारच्या औषधांपैकी ४ हजार ६९१ नमुने तपासण्यासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते.

# महापुरुषांबद्दल चुकीचे अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या अभिनेते राहुल सोलापुकरांवर गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करावी : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीचे; अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या अभीनेते राहुल सोलापुरकर यांचा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आम्ही तीव्र निषेध करीत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीचे वक्तव्य केल्यानंतर आता अभिनेते राहुल सोलापुरकर यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलही चुकीचे एकेरी वक्तव्य केले आहे. त्यांच्या या वक्तव्याने आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्या आहेत.महापुरुषांबद्दल सतत चुकीचे वक्तव्य करणाऱ्या राहुल सोलापुरकर यांचा तीव्र निषेध करीत आहोत.त्यांच्यावर गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करून अटक करावी असे मत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

अभिनेते राहुल सोलापुकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल ऐतिहासिक आगऱ्याहुन सुटकेबाबत वक्तव्य करताना अत्यंत अवमानकारक लाच शब्दाचा प्रयोग केल्याबद्दल राहुल सोलापुकरांचा आपण तीव्र धिक्कार करीत आहोत.या वक्तव्यानंतर राहुल सोलापुरकर यांचा एक व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला असुन त्या व्हिडीओत राहुल सोलापुकर हे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल चुकीचे एकेरी वक्तव्य करीत असल्याचे दिसुन येत आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचा विचार मांडला.विषमतेचे प्रतीक असणाऱ्या ब्राम्हण्यवादाचा,चातुर्वर्णाचा विरोध केला आहे.त्या ब्राम्हण्यवादातुन बाबासाहेबांना ब्राम्हण ठरविण्यचा आटापिटा राहुल सोलापुरकरांनी आपल्या वक्तव्यातुन केला आहे.

त्यामुळे महापुरुषांच्या बद्दल चुकीचे वक्तव्य करणाऱ्या राहुल सोलापुकर यांचा आम्ही तीव्र निषेध करीत आहोत. आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावणारे वक्तव्य केल्या प्रकरणी एट्रोसिटी कायद्या अंतर्गत गुन्हा नोंदवून



त्यांना तात्काळ अटक केली पाहिजे असे मत ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केले आहे.

# सर्प संरक्षण पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वाचे : प्रा. संपत खैरनार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सर्प प्रजातींची संख्या दिवसेंदिवस कमी होण्याच्या काळात त्यांची जागरूकता आणि संरक्षण यांचे महत्व वाढत आहे. साप हा शेतकऱ्यांचा मित्र असून निसर्गातील अन्न साखळीमध्ये सापाचे अनन्यसाधारण महत्व आहे. भारतीय उपखंडातील सर्पांची जैवविविधता अनमोल आहे. ती शेतकऱ्यास उपयोगी ठरते कारण ते कीड नियंत्रणात मदत करतात, तसेच जैविक संतुलन राखण्यात सहकार्य करते. तरी सापाची विनाकारण हत्या होते. सर्पहत्या रोखण्यासाठी जनजागृतीची गरज आहे. असे प्रतिपादन प्रा. संपत खैरनार यांनी केले.

के. के. वाघ महाविद्यालय काकासाहेबनगर येथे प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने 'सर्प संरक्षण आणि जागरूकता' या विषयावर खैरनार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. त्यांनी आपल्या भाषणातून सापाचे महत्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. अतुल गवारे होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना सापाचे महत्त्व आपल्या मनोगतातून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. वेदिका महाले यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय प्रा. भारती कुशारे यांनी करून दिला. सूत्रसंचालन स्वाती पानसरे हिने तर आभार प्रा. वैशाली पगार यांनी मानले. सदर कार्यक्रमाला नॅक समन्वयक प्रा. मिलिंद पवार, प्रा.किरण वाघ, प्रा.श्वेता शहाणे, प्रा.सचिन मोरे, प्रा. मधुकर आहेर, प्रा. सुरभी दाणी, प्रा. पूजा खडताळे, श्री मुकुंद बागुल, श्री. सचिन काळे आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## राज्यातील पात्रताधारकांना दिलासा कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय रद्द

(पान १ वरून..) शासन निर्णय प्रसिद्ध केला. दहा आणि त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये डी.एड., बी.एड. पात्रताधारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती देण्यास शिक्षण विभागाने मान्यता दिली होती. नियमित शिक्षकांच्या नियुक्तीपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या दृष्टीने ही तात्पुरती व्यवस्था असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले होते. मात्र, २०२२ च्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीमधील गुणांच्या आधारे करण्यात येणाऱ्या शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा २० जानेवारीपासून सुरू झाला आहे. त्यामुळे आवश्यक अर्हताधारक व पात्र शिक्षक नियमित तत्त्वावर उपलब्ध होणार आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन दहा आणि दहापेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये कंत्राटी तत्त्वावर शिक्षक नियुक्तीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कंत्राटी तत्त्वावर तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या नियुक्तीचा कार्यकाल संपुष्टात येणे किंवा ते कार्यरत असलेल्या पदावर नियमित शिक्षकाची नियुक्ती होणे यांपैकी जे आधी घडेल, त्या कालावधीपर्यंत सुरू राहील.

# सोयाबीन उत्पादकांना सरसकट भावफरक द्या : राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर: बाजारातील कमी झालेले भाव आणि सरकारच्या खेरदीतील गोंधळामुळे शेतकऱ्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागले. त्यामुळे हमीभावापेक्षा किमान ९०० ते एक हजार रुपये कमी भाव मिळाला. सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी सरकारने हा भाव फरक शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समितीचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे.



देशातील सोयाबीनचे भाव मागील तीन वर्षांपासून सातत्याने कमी होत आहेत. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. यंदा तर बाजारात हमीभावही मिळाला नाही. शेतकरी हमीभावाच्या अपेक्षेने सरकारी खरेदीकडे डोळे लावून बसले होते. मात्र सरकारच्या खेरदीतील गोंधळ पाहून बहुतांशी शेतकऱ्यांनी खुल्या बाजारातच कमी भावात सोयाबीन विकावा, अशी वेळ सरकारने आणली. एकतर शेतकरी विविध संकटात आहे. शेतकऱ्यांना उत्पादन कमी मिळाले. त्यातच बाजारभाव नसल्याने शेतकरी आडचणीत आले आहेत.

शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नसल्याने आणि बाजारात भाव नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या. शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. असे झाले तर शेतकरी पुढच्या हंगामात सोयाबीनचे पीक घेणार नाहीत. आपले पंतप्रधान खाद्यतेलात आत्मनिर्भर होण्याच्या गप्पा मारतात. पण सोयाबीन उत्पादकांना देशोधडीला लावून आत्मनिर्भर कसे होणार? हा प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःला विचारायला हवा.

सोयाबीन उत्पादकांना सरकारच्या आधाराची यंदा गरज आहे. सरकारने खुल्या बाजारात सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना भाव फरक द्यावा. जेणेकरून शेतकऱ्यांना हमीभाव तरी मिळेल. असे झाले तर शेतकरी पुढच्या हंगामातही सोयाबीन पीक घेतील. केवळ आश्वासनावर बोळवण करण्याची चूक सरकारने करू नये. सरकारने तातडीने १००० रुपये भाव फरक जाहीर करून पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरु करावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन केले जाईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य बाजार समिति संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यानी केली आहे.

# वाजे विद्यालयात माजी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक मेळावा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील सिन्नर येथील लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक बी.आर.जाजू होते. व्यासपीठावर जे.बी.पगार, येवलेकर ,बी.आर.कहांडळ, मोहन कणसे,किशोर जाधव,के.आर.गोसावी, प्रा. राजाराम मुंगसे,एस.आर पगार,व्ही.एन.शिंदे,रामदास वाजे ,सुरेश गीते,विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख व पर्यवेक्षक राम ढोली आदी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वतीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित माजी मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक पर्यवेक्षक, शिक्षक व माजी विद्यार्थी यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांनी केले. त्यात त्यांनी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यापाठीमागचा उद्देश आपला प्रास्ताविकातून व्यक्त केला . माजी विद्यार्थी अतुल साळवे,किरण डगळे,समाधान आव्हाड, निलेश कुर्हाडे,भरत शिंदे,महेश पवार,गायत्री मांडे,मनिषा भालेराव यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थी दशेतील जुन्या आठवणीना उजाळा दिला. सर्वच माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला सहकार्य व मदत करण्याचे आश्वासन दिले.

शिक्षक संजय गुजर सर यांनी मनोगत व्यक्त केले. य कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्याध्यापक आर.बी. जाजू यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात सर्व माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला सहकार्य करावे असे आव्हान केले. यावेळी इ. डी. चव्हाण, एकनाथ खैरनार, वर्षा सोनवणे, पद्मरेखा जाध ,प्रभाकर फटांगळे, शिवनाथ पांगरकर, शांताराम चांदोरे, सोमनाथ गिरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र शिंदे यांनी तर विद्यालयाचे पर्यवेक्षक अशोक निंबाळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व विद्यालयातील शिक्षक, उपशिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थितीत होते.

# जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर सिध्दाराम बनला मुंबईचा पोलीस



> आम्ही उपाशी तपशी राहून मुलाच्या शिक्षणात कुठेही खंड पडू दिला नाही. लोकांच्यात कामाला जाऊन त्याचे शिक्षण पूर्ण केले. याचे फळ आज आम्हाला मिळाले, आज किती आनंद झाला हे शब्दात सांगता येणार नाही.
> – महादेवी हंगरगी (आई )

> माझ्याकडून शेतातील व इतर अवजड कामे होत नाहीत, त्यामुळे लोकांचे जनावर राखण्याचे काम करत होतो. आमच्या घरात शिक्षणाचे कोणाला गंध नव्हता माझा मुलगा पोलीस झाल्याचे ऐकून आनंद द्विगुणीत झाला आहे.
> – मलकण्णा हंगरगी (वडील )

> आई वडील भाऊ बहिण, मित्र, गुरुंच्या मदत आशीर्वादाने, जिद्द चिकाटी व परिश्रमाच्य जोरावर आज ध्येयापर्यंत पोहचल्याचा आनंद झाला आहे. दोन तीनदा एक दोन मार्कांनी हुलकावणी दिलेल्या परीक्षेत आज राज्यात प्रथम क्रमांकाने पास झाल्याचा अभिमान वाटत आहे.
> – सिध्दाराम हंगरगी(मुंबई पोलीस भरती विद्यार्थी)

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पानमंगरुळ/प्रतिनिधी: मुंबईत झालेल्या पोलीस भरतीत पान मंगरुळचा सिध्दाराम मलकण्णा हंगरगी यांनी १५० पैकी १४२ गुण प्राप्त करून राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत पोलीस भरती झाला आहे. आई-वडील, भाऊ -बहीण निरक्षर असताना घरात साक्षरतेचा गंध नसतानाही जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर सिध्दाराम यांनी मुंबई पोलीस भरतीत अव्वल स्थान पटकाविला आहे.

अक्कलकोट तालुक्यातील पान मंगरुळ येथील सिध्दाराम मलकण्णा हंगरगी याला शिक्षणाची आवड. घरातले सगळे निरक्षर असताना आपण काहीतरी करू अशा प्रयत्न त्याने बी.कॉम चे शिक्षण पूर्ण केले वडील मलकण्णा दुसऱ्यांचे जनावर राखत होते, आई महादेवी या पडेल ते काम करत,

### आई– वडील, भाऊ –बहीण निरक्षर असताना राज्यात नंबर वन

भाऊ बाबुराव भोळसर, बहिण संगिता ही दुसऱ्यांच्या शेतात काम करत. आई, वडील, बहीण यांनी आपला मुलगा भाऊ शिकला पाहिजे यासाठी वाटेल ते काम करून शिक्षणास प्रोत्साहन दिले याचे फळ त्यांना मिळाले.

सिध्दाराम हा मागील तीन-चार वर्षापासून पोलीस भरतीसाठी अहोरात्र मेहनत घेत होता, प्रत्येक वेळी एक दोन मार्कांनी हुलकावणी देत होते, परंतु पट्ट्यांनी जिद्द काही सोडला नाही. आर्थिक परिस्थिती हालाखीची असताना त्याला अर्केडमी लावणे ही शक्य नव्हते. शेवटी घरातील सर्वांच्या सहकार्याने युवा करिअर अर्केडमी शिंगडगाव येथे दाखल झाल्यावर एका वर्षातच त्यांनी झेंडा रोवला तो ही मुंबईत! यंदा मुंबईत झालेल्या पोलीस भरतीत शारीरिक परीक्षेत ५० पैकी ४२ गुण, लेखी परीक्षेत १०० पैकी ९५ गुण व एनसीसी चे ५ गुण असे १५० पैकी १४२ गुण मिळवून पान मंगरुळ चे नाव मुंबईत सुवर्ण अक्षरात कोरला आहे.

## माहिती अधिकार कार्यकर्ते केतन भोज यांची चौकशीची मागणी

## सर्व प्रकरणाची चौकशीची मागणी

# मुंबई महानगरपालिका घाटकोपर एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता गेली अनेक वर्षे एकाच ठिकाणी कसे; याला कोणाचे अभय ?





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोप/प्रतिनिधी : मुंबई महानगरपालिकेच्या एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागात काही अनागोंदी प्रकार सुरू आहे असा संशय काही सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करत आहे. याआधी ही घाटकोपर पश्चिम विभागातील सर्व प्रभागात स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानाअंतर्गत असलेल्या वस्ती स्वच्छता योजना आणि डीप क्लीनिंग योजनेचे सर्वच ठिकाणी तीनतेरा वाजलेले दिसत आहे.अशातचं या घन कचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक ऑअभियंता हे गेली अनेक वर्षे म्हणजे २०१३ पासून मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागात सहाय्यक अभियंता(घन कचरा व्यवस्थापन )या पदावर कार्यरत आहे. शासन अधिसूचना दि.२५.५.२००६ नुसार विधिनियम विषयक २००५ मधील प्रकरण दोन, कलम ३(१) अन्वये सेवेतील अधिकारी यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा आहे.मग हे घन कचरा व्यवस्थापन एन विभागाचे सहाय्यक अभियंता गेली बारा वर्षे या एकाच ठिकाणी काम कसे काय करत आहे.याला कोणाचे अभय आहे?तरी आता सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.)यांच्या कार्यकाळाची व यांच्या विभागाच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते केतन भोज यांनी यावर आवाज उठवला असून ते याबाबत राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्याचे नगरविकास मंत्री, मुंबई महानगरपालिकेचे मुख्य आयुक्त तथा प्रशासन तसेच राज्याचे मुख्य सचिव,लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव,सहाय्यक आयुक्त एन विभाग यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करणार आहेत. आणि या सर्व प्रकरणाची चौकशीची मागणी करणार आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### पिकपमध्ये झोपलेल्या इसमाचा पळविला मोबाईल

सोलापूर : मार्केट यार्ड येथे पिकअप गाडीमध्ये झोपलेल्या चालकाचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २१ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी उत्तरेश्वर विश्वनाथ इतापे (वय ३२, रा. मु. पो. आरणगाव, ता. केज, जि. बीड ) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### बल्करने दुचाकीला ठोकरले, गुन्हा दाखल

सोलापूर : शांती चौक ते जुना बोरामणी नाका २५६ गाळा येथे दुचाकीला बल्कर वाहन क्रमांक के ए ३२५७ चालकाने ठोकल्याची घटना सहा फेब्रवारी रोजी घडली. याप्रकरणी रूपाली आनंद दासी (वय ३५, रा. राधाकृष्ण नगर भाग २) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून महम्मंद इस्माईल लाल अहमद शेख (वय ३५ रा. वाडी, निजामखेड, ता. चित्तापूर, जि. गुलबर्गा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# माढा-सिनाचे पाणी बावीला आणल्यावरच फेटा बांधणार : आमदार अभिजीत पाटील

## आमदार पाटील व आमदार कांबळे यांची बग्गीतून व घोड्यावरून निघाली मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील व पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे व बावीचे सुपुत्र आमदार सुनील कांबळे यांची बग्गीतून व घोड्यावरून मोठ्या उत्साहात ग्राम स्थांनी सत्कार करत मिरवणूक काढण्यात आली.

ग्रामदैवत बालिंगेश्वर व विठ्ठल रुक्मिणी मातेस नतमस्तक होऊन ग्रामस्थांनी मतदानरुपी आशीर्वाद दिल्यामुळे हे परिवर्तन घडले आणि हा विजय मिळाला. निवडणुकीच्या संघर्षात बावीच्या अनेक सहकार्यांनी सर्वांच्या पुढे येऊन सहभाग घेतला. बावीमध्ये बैलगाडा शर्यतीमुळे विजयाचे वातावरण निर्माण झाले. बावीकरांच्या सत्काराने मला दहा हत्तीचे बळ मिळाले. बीवी गावाला सीना-माढा योजनेचे पाणी आणल्यावरच गावात फेटा बांधणार हा संकल्प मी केला आहे आणि तो पूर्ण करण्यासाठी मी कायम कटिबद्ध आहे असे प्रतिपादन माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी केले.

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे व बावीचे सुपुत्र आमदार सुनील कांबळे व माढा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिजीत पाटील यांची बगीतून मिरवणूक काढण्यात आली ग्रामस्थांनी जेसीबी द्वारे फुलाची उधळण करत नागरी सत्कार केला.

यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे सदस्य भारत शिंदे, तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, संभाजी ब्रिगेड दिनेश जगदाळे, बालाजी पाटील, जिल्हा युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी, डीएस मोरे महाराज, कुरण गिड्डे, सयाजी पाटील, राजाभाऊ पाटील, अनिल मोरे, लक्ष्मण मोरे, निलेश पाटील, उल्हास मोरे, दयानंद महाडिक देखमुख, पप्पू मोरे, सुरज मोरे, स्वप्नील मोरे, शुभम मोरे, आकाश मोरे, सुदर्शन मोरे, आदर्श मोरे, तेजस मोरे, निखिल मोरे, रामराजे मोरे, नागेश मोरे, केदार मोरे यासह आदी उपस्थित होते.



# जि. प. शाळेतूनच माझ्या शिक्षणाची सुरुवात : विलास यामावार



### शिवम्मा प्रतिष्ठानच्या वतीने वाढदिवसानिमित्त सत्कार करून विविध उपक्रम राबविले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चपळगाव/प्रतिनिधी : जिल्हा परिषद शाळेतूनच माझ्या शिक्षणाची सुरुवात झाली असून तुम्हीही शिक्षणाच्या जोरावर यश संपादित करू शकता असे मनोगत उपविभागी पोलीस अधिकारी विलास यामावर यांनी व्यक्त केले, शिवम्मा प्रतिष्ठान चपळगाव यांच्यावतीने त्यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा करून त्यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी यामावर यांनी दहा वर्षे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून काम केल्याचेही आवर्जून सांगितले, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वर्षा भंडारकवठे होत्या.

याप्रसंगी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पो,नि,महेश स्वामी वळसंग पोलीस ठाण्याचे पो,नि,अनिल सनगले पो,नि,सतीश रणदरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी उपस्थित सन्माननीय मान्यवरांनी शुभेच्छारुपी मनोगत व्यक्त केले,याप्रसंगी शिवम्मा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तमा भाऊ गजधाने उपसरपंच गणेश कोळी पोलीस पाटील विवेकानंद हिरेमठ तंटामुक्त अध्यक्ष कल्लाप्पा बडूरे माजी चेअरमन संजय बानेगाव ग्रामपंचायत सदस्य श्रावण गजधाने जिल्हा परिषद मुख्याध्यापक सतीश वाल.,

# बी एस सोशल फाउंडेशन सोलापूर यांच्या वतीने रमाबाई आंबेडकर जयंती निमित्त मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर/प्रतिनीधी : सालाबाद प्रमाणे या ही वर्षी बी एस सोशल फाउंडेशन सोलापूर यांच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर जयंती निमित्त भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली मूर्तीचे पूजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे राज्याध्यक्ष राजाभाऊ सरवदे सुबोध वाघमोडे, के. डी. कांबळे नागेश रणखांबे, शुभम सोनकांबळे, माजी नगरसेवक निकाळजे, राजाभाऊ कदम, महादेव बाबरे, सुग्रीव जेटीथोर, याप्रसंगी बी एस सोशल फाउंडेशनच्या आधारस्तंभ व मार्गदर्शक बसवराज सोनकांबळे व मार्गदर्शक अश्विन गायकवाड, सुधीर बिडबाग, महेश गजधाने, नितीन हालसंगे बी.एस सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष यश शिवशरण, प्रेम शिवशरण मंडळाचे अध्यक्ष आतिश शिरसाट, अजय कसबे, पृथ्वीराज शिवशरण, संदीप इंगळे, बॉबी कांबळे, चिराग शिवगदगे, केतन शिवशरण, विनीत शिवशरण, प्रमोद सवाईसर्जे, आदित्य कांबळे, व्यंकटेश चिपा व तमाम आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.

# कष्ट, निष्ठा व चिकाटीचे फलित म्हणजे यश : सभापती बाळासाहेब क्षीरसागर



### निफाड मोरे महाविद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ हा विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी नवी दालणे निर्मिण करणारा समारंभ आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर विविध स्पर्धेत सहभागी होत पारितोषिक प्राप्त केलेले आहेत. ते तुमच्या कष्टाचे निष्ठेचे आणि चिकाटीचे फलित आहे. केवळ शैक्षणिक प्रगती महत्वाची नसून सर्वच क्षेत्रात प्रगती करण्याची गरज आहे. आपले व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी आपण महाविद्यालयाच्या सर्वच स्पर्धामध्ये सहभाग घ्यावा. आपल्या यशातच मविप्र समाजाचे, महाविद्यालयाचे आपले स्वतःचे यश अवलंबून असते ''असे प्रतिपादन मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी, क.ग.दा. मोरे निफाड महाविद्यालयात आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्या प्रसंगी केले. यावेळी प्रमुख वक्ते कवी केशव खटिंग यांनी सांगितले की, मविप्र समाज संस्था ही समाजाला आणि विध्यार्थ्यांना योग्य शैक्षणिक दिशा देणारी आदर्श शैक्षणिक संस्था आहे.

ज्या मातीने, मायने आणि महाविद्यालयाने आपणास मोठे केले आहे. त्याचे ऋण कायम जपावे असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रम प्रसंगी

म. वि. प्र. समाज संस्थेचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, संचालक शिवाजी गडाख, डॉ.उत्तम डेरले,प्राचार्य प्रोफ.(डॉ.)सुरेशजी जाधव,माधव गीते,जानकीराम धरराव,सुधाकर कापसे,रामनाथ धरराव, शाम शिंदे,राजाराम काळे, योगेश व सुरज कुंदे पत्रकार राजेंद्र थोरात उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली व मान्यवरांचा परीचय डॉ.महेश बनकर यांनी करून दिला.

प्रास्ताविकेत प्राचार्य प्रोफ.डॉ.सुरेश जाधव यांनी महाविद्यालयाच्या शै.वर्ष २४-२५ मधील सर्व बाबींचा आढावा घेत विकासाचा आलेख मांडला, कर्मवीरांच्या प्रेरणेतून आणि सर्व मविप्र कार्यकारिणी व सभासद यांच्या मार्गदर्शन व सहकार्यातून निफाड महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची साहित्य, कला क्रीडा आणि संशोधन क्षेत्रात भरीव होत असल्याचे सांगितले,

यावेळी बक्षिसपात्र, गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापक यांचा यथोचित गौरव व सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पंकज गांगुर्डे प्रा.डॉ.महेश बनकर यांनी केले तर आभार प्रा.अभय वडघुले यांनी मानले

कार्यक्रम यशस्वीततेसाठी डॉ.प्रवीण ढेपले, प्रा. योगेश कडलग, डॉ. सुरेखा जाधव, डॉ. आर.डी.शिंदे, प्रा.चंद्रशेखर मोरे, प्रा.चेतन कुंदे, श्रीमती मनीषा कोटकर,आर.बी.सुरवाडे, प्रा. शंकर गायकवाड, प्रा.अतुल आहेर, अधीक्षक संजय गायकवाड व सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# टाकळीवाडी येथे राहुलदादा घाटगे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडीतालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर लि. टाकळीवाडी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल दादा घाटगे यांचा वाढदिवस १४ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे.

यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी आयोजन करण्यात आली आहे. सदरचा कार्यक्रम टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे संपन्न होणार आहे .

रक्तदात्याला आकर्षक अशी रूकडी बॅग भेटवस्तू देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजक अनिल कांबळे, रामचंद्र बेडकिहाळे, निशांत गोरे तसेच सेवा सदन निरामय प्रा.लि.इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमानाने संपन्न होणार आहे.

### पंढरपूर शहर लवकरात लवकर स्वच्छ होण्याच्या दृष्टीने विशेष स्वच्छता मोहिम


### मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांची माहिती


# नगर परिषदेच्या वतीने शहरातील कचरा उचलण्या सोबतच युद्धपातळीवर जंतुनाशक फवारणी काम सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरामध्ये दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी एकादशी सोहळा संपन्न झाला माघी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी देश विदेशातून व संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. या यात्रा कालावधीत सुमारे ३ ते ४ लाख वारकरी-भाविक दर्शनासाठी आले आहेत. या येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पंढरपूर नगर परिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी पंढरपूर शहर लवकरात





लवकर स्वच्छ होण्याच्या दृष्टीने विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात यावी अश्या सूचना दिल्या आहेत त्या नुसार युद्ध पातळीवर विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी दिली.

माघी यात्रा कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपूर शहरामध्ये दाखल झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर व शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. यात्रा नंतर बहुतेक द्वादशी दिवशी शहरातील कचरा उचलण्याचे काम हाती घेण्यात येत परंतु यावर्षी वाहने प्रदक्षिणा मार्ग व इतर ठिकाणी जाण्यास अडचण नसलेने मठामध्ये व परिसरात साठलेला कचरा गोळा करण्याचे काम लगेच हाती घेण्यात आले आहे. एकादशीच्या रात्रीपासुनच २४ तास स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे काम चालू केले आहे येत्या दोन दिवसात शहरातील सर्व कचरा उचलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याकामी शहरासह ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर, शहर उपनगर आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी ७०० ते ८०० स्वच्छता कर्मचारी काम करत आहेत मात्र बऱ्याच ठिकाणी भाविकांनी उघड्यावर खरकटे अन्न व इतर घाण केल्याने दुर्गंधी पसरू नये म्हणून कचरा उचलण्याचे कामा बरोबरच नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जंतुनाशक पावडर फवारणी व ४ ब्लोअर मशीन ने बायो कल्चर फवारणी हाती घेतली आहे त्यामुळे झालेल्या घाणीचे डीकंपोस्टिंग होऊन दुर्गंधी नष्ट होणार आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ४१ घंटागाडी, आरोग्य विभागाकडील ६ टिपर, ३ कॉम्पॅक्टर, ६ डंपिंग ट्रॉलिने व जेसीबीच्या सहाय्याने ८०० कर्मचाऱ्यामार्फत स्वच्छता करण्यात येत आहे

स्थानिक नागरिकांनी व भाविकांनी आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहनही मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी केले असून मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी अँड.सुनिल वाळूजकर आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, आरोग्य निरीक्षक नानासाहेब गोरे सर्व विभाग प्रमुख यात्रा स्वच्छ व सुरळीत पार पडण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत.

## थोडक्यात...

### नाशिक-पुणे मार्गावर पिस्तूलचा धाक दाखवत लूट, सहा लाखांची औषधे पळवली

संगमनेर : पुणे नाशिक मार्गावर घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत माल मोटार चालकाला लुटण्याचा प्रकार घडला. ट्रक चालकाला पिस्तुलाचा धाक दाखवत शेतीसाठी असलेल्या औषधांचे ५ लाख १२ हजार रुपयांचे १८१ बॉक्स आणि बॅग ट्रकमधून अज्ञात दोघा व्यक्तींनी पळविले. घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार वाढत्या गुन्ह्याच्या प्रमाणाने एकूणच पोलिसांच्या कार्यक्षमतेबद्दल पुन्हा सवाल उपस्थित होत आहे. संगमनेर तालुक्यातील पठार भागातील माहुली घाटामध्ये ही घटना घडली असून त्यात ट्रक चालकाच्या तोंडाला रुमाल लावून, त्याला बेशुद्ध करत, पिस्तूलचा वापर करीत लुटमार केल्याची घटना घडली. घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीलगत पुणे जिल्ह्याचे सीमा असल्याने अहिल्यानगर, पुणे जिल्ह्यातील गुन्हेगारांची या परिसरात मोठी वर्दळ असते. त्यातून सातत्याने वेगवेगळे गुन्हे वारंवार घडत आहेत. पोलिसांना मात्र या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात अपयश येत आहे. नुकत्याच झालेल्या लुटी बाबतची माहिती अशी की, सिद्धिविनायक लॉजिस्टिक कंपनीचा शेती औषधांचा माल घेऊन फुरसुंगी, पुणे येथून लेलँड कंपनीचा ट्रक (एमएच ४२ ए क्यू ८०७८) हा नाशिककडे चालला होता.

# तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांचेशी हर्षवर्धन पाटील यांची भेट



## चेन्नई येथे भेटीत साखर उद्योगावर संवाद

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :चेन्नई येथे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचेशी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची रविवारी (दि.९) भेट झाली. या भेटीप्रसंगी या दोन्ही नेत्यांनी तामिळनाडूतील साखर उद्योगाच्या विकासासंदर्भात संवाद साधला. तत्पूर्वी हर्षवर्धन पाटील यांची तामिळनाडूच्या सहकार मंत्र्यांबरोबर एक बैठक झाली

तामिळनाडू राज्यातील साखर उद्योगाच्या विकासासंदर्भात राज्य सरकार हे केंद्रीय सहकारिता विभागाला पत्र लिहिणार आहे, तसेच राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या माध्यमातून

### तामिळनाडूच्या सहकार मंत्र्यांबरोबर हर्षवर्धन पाटील यांची बैठक

**मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या भेटीपूर्वी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांची तामिळनाडूचे सहकार मंत्री के. आर. पेरियागरुप्पन यांचेसमवेत तेथील साखर उद्योगाचा विकास व अडीअडचणीसंदर्भात एक बैठक झाली. तामिळनाडूमध्ये सद्या १८ सहकारी साखर कारखाने आहेत. या बैठकीमध्ये तामिळनाडू राज्यातील साखर कारखानदारीचा विकास, इथेनॉल प्रकल्प उभारणी व त्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगम (एनसीडीसी) कडून कर्ज पुरवठा करणे आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. हर्षवर्धन पाटील हे राष्ट्रीय सहकारी विकास निगम नवी दिल्लीचे संचालकही आहेत.**



तामिळनाडू राज्याचा असलेला सरासरी साखर उतारा व देय एफआरपी या संदर्भात महासंघाचे अध्यक्ष म्हणून आपण पाठपुरावा करून मार्ग काढावा, अशी चर्चा मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन व हर्षवर्धन पाटील यांच्या भेटीमध्ये झाली. भारत सरकारच्या राष्ट्रीय सहकारिता मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव तसेच भारतीय राष्ट्रीय कृषि सहकारी विपणन संघ लिमिटेड (नाफेड) चे अतिरिक्त कार्यकारी संचालक पंकज कुमार बंसल यांचेकडील गिंडी, चेन्नई येथे आयोजित कार्यक्रम प्रसंगी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचेशी हर्षवर्धन पाटील यांची भेट झाली. यावेळी तामिळनाडू राज्याचे सहकार मंत्री के. आर. पेरियागरुप्पन हेही उपस्थित होते.

## व्हाइस ऑफ मिडियाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार आणि कर्तुत्ववान व्यक्तींच्या सत्काराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे : पत्रकार बांधवांच्या कल्याणासाठी सदैव कार्यरत असलेल्या व्हॉइस ऑफ मीडिया कळंब यांच्यावतीने दर्पण दिनानिमित्त बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंडे कॉम्प्लेक्स परळी रोड कळंब येथे ज्येष्ठ पत्रकार व कर्तुत्वांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.विश्वनाथ अण्णा तोडकर (सचिव पर्याय संस्था हासेगाव) तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट इंग्लिश स्कूलचे संचालक श्री .रवी नरहिरे तर उद्घाटक म्हणून व्हॉइस ऑफ मीडिया कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य श्री. विजय चोरडिया तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी श्री. संजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.संजय पवार, उपविभागीय अधिकारी (एसीबी) श्री. सिद्राम म्हेत्रे, तहसीलदार श्री.हेमंत ढोकले, पोलीस निरीक्षक श्री रवी सानप, सहाय्यक पोलीस निरीक्षक ढोकी श्री. विलास हजारे, व्हॉइस ऑफ मीडिया महाराष्ट्र राज्य कार्यवाहक श्री. अमर चोंदे, व्हॉइस ऑफ मीडिया जिल्हाध्यक्ष अहिल्यानगर श्री. गोरक्षनाथ मदने, व्हाईस ऑफ मीडिया जिल्हाध्यक्ष दक्षिण अहिल्यानगर कार्याध्यक्ष श्री. गणेश कविटकर, व्हॉइस ऑफ मेडिया अहिल्यानगर उपाध्यक्ष गडाख धाराशिव जिल्हाध्यक्ष श्री. हुंकार बनसोडे तर ज्येष्ठ पत्रकार म्हणून श्री. ज्ञानेश्वर पतंगे, श्री.परमेश्वर पालकर, श्री.शितल कुमार धोंगडे तर सत्कारमूर्ती म्हणून ज्येष्ठ पत्रकार श्री.गणेश अण्णा शिंदे,श्री् माधव सिंग राजपूत, श्री. सुभाष घोडके, श्री. दिलीप झोरी, श्री. तुळशीराम चंदनशिवे, शरद चंद्र महाविद्यालय शिरढोण प्राचार्य प्रा.डॉ. साजेद चाऊस तर आदर्श मुख्याध्यापक म्हणून श्री.राजेंद्र बिक्कड, अस्थिरोग तज्ञ डॉ. श्री.अजित देशमुख,दंत रोग तज्ञ श्रीमती डॉ. करिष्मा शेख हे या कार्यक्रमासाठी मान्यवर म्हणून आणि सत्कारमूर्ती म्हणून उपस्थित राहणार आहेत तरी तालुक्यातील व्हाईस ऑफ मीडियाचे सर्व पदाधिकारी सदस्य आणि सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन व्हाईस ऑफ मीडिया कळंब शाखेच्या पदाधिकारी व सदस्य यांनी केले आहे.

## औषधांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह, दोन वर्षात तपासलेल्या २२ हजारापैकी आठ औषधे कमी दर्जाची

(पान १ वरून..) औषधांसंदर्भात सर्व रुग्णालयांच्या प्रमुखांना कळविण्यात आले असून, त्यांचा वापर थांबविण्याच्या सूचना करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणने वैद्यकीय महाविद्यालये व जिल्हास्तरावरील रुग्णालयातील औषध भांडारमधील औषधांचे नमूने घेऊन ते एनएबीएल प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविले होते. यामध्ये आरोग्य विभागांतर्गत असलेल्या जिल्हा रुग्णालयांमधील औषध भांडारामधून ८६ प्रकारच्या औषधांचे नमूने तपासणीसाठी पाठवले होते. यापैकी ३२ औषधे वापरण्यास योग्य असून ५४ औषधांच्या नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयातील औषध भांडारामधून घेतलेल्या ६९ प्रकारच्या औषधांच्या नमुन्यांपैकी १४ नमुने वापरण्यास योग्य असल्याचे अहवालात म्हटले आहे. मात्र यापैकी ५५ औषधांचा अहवाल अद्याप प्रलंबित असल्याची माहिती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

राज्यातील आरोग्य संस्थात पुरवठा होत असलेली औषधे प्रयोगशाळेत काटेकोरपणे तपासून घ्यावीत. तसेच रूग्णाची गैरसोय होणार नाही यासाठी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवावा, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

### ठाणे, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व वर्धा येथे उभारणार किमोथेरपी सेंटर

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

# ‘रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा; जनसामान्यांची सेवा हाच धर्म’

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

ठाणे (जिमाका) : हे शासन सर्वसामान्यांचे असून त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी ‘रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा आणि जनसामान्यांची सेवा हाच धर्म’ या तत्वांवर चालणारे असून नेहमीच सर्वसामान्यांसाठी काम करीत राहील, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

सार्वजनिक आरोग्य विभाग वतीने ६ डे-केअर किमोथेरपी सेंटर (ठाणे, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व वर्धा) उभारण्यात येणार असल्याची घोषणा आणि कर्करोग मोबाईल व्हॅन-८, १०२ रुग्णवाहिका-३८४, सीटी स्कॅन-२, डव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका-७, डिजिटल हँड हेड एक्स-रे मशिन-८० चा लोकार्पण सोहळा जिल्हा नियोजन भवन सभागृह, येथे आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी आयुष मंत्रालय तसेच स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग मंत्री प्रकाश आबिटकर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ड.आशिष जयस्वाल, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, आमदार डॉ.बालाजी किणीकर, आमदार विजय शिवतारे, नगरविकास विभागचे प्रधान सचिव असिम कुमार गुप्ता, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रोहन घुगे, उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव श्री.नविन सोना, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई संचालक अमगोथू श्री रंगा नायक, आरोग्य सेवा संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, राष्ट्रीय नागरी अभियानाचे संचालक डॉ.स्वप्नील लाळे, सुप्रसिध्द अभिनेता तथा माजी खासदार गोविंदा आदि मान्यवर उपस्थित होते.






यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, मी नेहमीच जनसामान्यांची सेवा हाच धर्म असे मानून काम करीत आलो आहे. आत्ताच खापट बस डेपो येथे एसटी ड्रायव्हर व कंडक्टर यांच्यासाठी निर्माण केलेल्या उत्तम दर्जाच्या विश्रांतीगृहाचे उद्घाटन केले. त्याचबरोबर जिथे एसटी डेपो तेथे कॅशलेस हॉस्पिटल ही संकल्पना संपूर्ण राज्यासाठी जाहीर केली आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना राज्यात ७०० पेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत आहे. महिलांचे कुटुंबाच्या आरोग्याकडे पूर्ण लक्ष असते, परंतु स्वतःच्या आरोग्याकडे काहीही लक्ष नसते. आज आपण लोकार्पण केलेल्या या मोबाईल आरोग्य तपासणी यामुळे प्रत्येक गावागावातील महिलांची आरोग्य तपासणी करणे सहज साध्य होणार आहे. कॅन्सर संपविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

माझ्या अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात मी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून जवळपास ५१ हजार रुग्णांचे प्राण वाचवू शकलो. तब्बल ४६० कोटी रुपयांचे सहाय्य आपण गरजू रुग्णांना करू शकलो, यापेक्षा मोठे समाधान नाही, असे सांगून श्री. शिंदे म्हणाले की, हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. त्यांच्या आयुष्यात बदल घडविणे, हेच या शासनाचे ध्येय आहे. समाजातील सर्व घटकांसाठी विविध योजना सुरू केल्या, रखडलेले प्रकल्प मार्गी लावले. सर्वसामान्यांचे हे शासन असेच जोमाने काम करीत राहील. लवकरच उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही श्री.शिंदे यांनी यावेळी केली.

आरोग्यमंत्री श्री.प्रकाश आबिटकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आरोग्य विभागाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू केले असून, जवळपास दोन कोटी महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्याचा त्यांनी संकल्प केला आहे. यासाठी शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री श्री.शिंदे पुढे म्हणाले की, महात्मा फुले आरोग्य योजनेंतर्गत आधी दीड लाखापर्यंतची मदत केली जात होती. परंतु आता या शासनाने सरसकट सर्वांसाठी त्याची मर्यादा पाच लाखापर्यंत केली आहे. दुर्गम भागातील जनतेसाठीही हे शासन तत्परतेने काम करण्यास कटिबद्ध आहे.

कॅन्सर, टी.बी., हृदयरोग अशा आजारांचे निदान लवकरात लवकर झाल्यास त्यावर उपचार करणे शक्य आहे. त्यामुळे आरोग्य तपासणी या उपक्रमाचा सर्वसामान्य नागरिकांना निश्चित लाभ होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असे मानून श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मदत करण्यात आली आहे. गेल्या आठ वर्षात हृदयाला छिद्र असणाऱ्या ५ हजार ५०० लहान बालकांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या, हीच तर खरी पुण्याई आहे, असे सांगून श्री.शिंदे पुढे म्हणाले की, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी ही व्यवस्थेची महत्त्वाची दोन चाके आहेत. त्यांनी एकत्र मिळून जनतेच्या हिताची कामे करणे अपेक्षित आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी चांगली कामे केली म्हणूनच शासन लोकोपयोगी योजना यशस्वीपणे राबवू शकले. त्यापैकीच एक शासन आपल्या दारी हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला. संपूर्ण राज्यात पाच कोटी लाभार्थ्यांना विविध लाभ देण्यात आले. हे शासन गतिमान आणि लोकाभिमुख आहे आणि यापुढेही हे शासन अशाच प्रकारे काम करेल, असेही ते शेवटी म्हणाले.

आरोग्य मंत्री श्री.प्रकाश आबिटकर यांनी आपल्या मनोगतात उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व ते पुढे म्हणाले की, राजकारणी सर्वसामान्यांसाठी काम करणारे असावेत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे काम पाहिले की याची खात्री पटते. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून आजपासून राज्यातील २ कोटी महिलांची आरोग्य तपासणी होणार असून यामध्ये रक्त तपासण्या, हिमोग्लोबिन, मधुमेह, रक्तदाब, आवश्यकतेनुसार सर्व तपासण्या निदान व उपचार करण्यात येणार आहेत. हा सुरु करण्यात आलेला उपक्रम महाराष्ट्रातील तमाम मायमाऊलींसाठी समर्पित आहे.

यावेळी आयुष मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री श्री.प्रतापराव जाधव यांनी सातारा जिल्ह्यातील दरे गावात आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून ७० कोटी निधी खर्चून नॅचरोपॅथी आणि वेलनेस सेंटर त्याचबरोबर राष्ट्रीय स्तरावरील हरबल गार्डन उभारण्यात येईल, अशी घोषणा केली. तसेच आयुर्वेदाचे महत्व प्रत्येक भारतीयाला कळण्यासाठी हर घर आयुर्वेद या उपक्रमाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला.

**जिल्हा परिषदेच्या पुढाकारातून मायका पचे झाले लोकार्पण**

सुदृढ मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन करणाऱ्या मायका या पचे लोकार्पण उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.या अपॅचा लाभ सर्व वयोगटातील नागरिकांना होवू शकतो. गुगल प्ले स्टोअरवरुन हे प डाऊनलोड करता येवू शकते, अशी माहिती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रोहन घुगे यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्यात कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी उत्कृष्ट कार्य केलेल्या कर्करोगतज्ञ डॉक्टरांचा, राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट काम केलेल्या डॉक्टरांचा, दंतचिकित्सक तज्ञ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच टी.बी. मुक्त भारत अभियानांतर्गत निक्षय मित्र फूड बास्केट चे वितरण क्षयरोग रुग्णांच्या नातेवाईकांना करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका मृण्मयी भजक यांनी केले तर आभार प्रदर्शन आरोग्य उपसंचालक डॉ.अशोक नांदापूरकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी ,कर्मचारी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कसा असेल सार्वजनिक आरोग्य विभागाचा उपक्रम

- राज्यातील २ कोटी महिलांची आरोग्य तपासणी होणार असून यामध्ये रक्त तपासण्या, हिमोग्लोबिन, मधुमेह, रक्तदाब, आवश्यकतेनुसार सर्व तपासण्यानिदान व उपचार करण्यात येणार आहे.
- राज्यात ८ ठिकाणी अकोला, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर, ठाणे, नागपूर, नाशिक आणि पुणे येथे कॅन्सर व्हॅन लोकार्पण सोहळा होणार आहे. या वाहनांमध्ये कर्करोग प्रतिबंधात्मक (झीर्शींशपींळींश जपलेश्रेसू) समुपदेशन, निदान व बायोप्सी या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. हे वाहन ज्या ठिकाणी जाणार आहे त्या ठिकाणी कर्करोगासंबधी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ यांच्या स्तरावर कर्करोग वाहनाचा दौरा कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे.
- नव्याने खरेदी केलेल्या ७ ड्ड डव्हान्स लाईप सपोर्ट रुग्णवाहिका सद्य:स्थितीत आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या गडचिरोली-उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा, चंद्रपूर-उपजिल्हा रुग्णालय, वरोरा, सिंधुदुर्ग-उपजिल्हा रुग्णालय कणकवळी, पुणे-उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर, रत्नागिरी-प्राथमिक आरोग्य केंद्र, मालगुंड, रायगड-ग्रामीण रुग्णालय महाड या ठिकाणी देण्यात येणार आहेत.
- सद्य:स्थितीत अकोला, नाशिक, अमरावती, सातारा, पुणे गडचिरोली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व बीड या ९जिल्ह्यांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर (किमोथेरपी युनिट) ची स्थापना झालेली आहे.
- राज्यात ठाणे सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व वर्धा या ६ जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोग उपचारासाठी किमोथेरपीची सुविधा नव्याने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कॅन्सर डे केअर किमोथेरपी सेंटर अंतर्गत प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारीका यांच्यामार्फत कॅन्सर रुग्णांना उत्कृष्ट दर्जाची किमोथेरपी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- उपजिल्हा रुग्णालय वैजापूर, छत्रपती संभाजीनगर व उपजिल्हा रुग्णालय डहाणू, जि.पालघर येथील सार्वजनिक खाजगी भागिदारीतून नव्याने कार्यान्वित करण्यात येणाऱ्या सीटी स्कॅन सुविधांचे लोकार्पण आज करण्यात आले.
- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत शोधलेल्या संशयित क्षयरुग्णांच्या छातीचा एक्स-रे काढण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून राज्यातील ३४ ग्रामीण जिल्हे, २२ महानगरपालिका व मुंबईच्या २४ वार्डासाठी राज्यस्तरावरुन आलेल्या ८० डिजिटल पोर्टेबल हँड एक्स-रे मशीनचे लोकार्पण आज करण्यात आले.
- राज्यामध्ये १०२ योजनेंतर्गत गरोदर माता व नवजात शिशुंना रुग्णालयात संदर्भित करण्यासाठी३८४ नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.